Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# छांदोग्योपनिषदातील व्यक्तिनामांचे ऐतिह्य

डॉ. अकल्पिता सौरभ सप्रे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.

वेदवाङ्मयाचे भाग केले तर मंत्र , कर्म आणि ज्ञान असे विभाग करता येतील. ही ग्रंथविभागणी अशीही करता येईल- मंत्रमय संहिता म्हणजे प्रत्यक्ष वेद- वैदिक धर्माचा पाया , कर्मकांडाचा विस्तार म्हणजे ब्राह्मण- यज्ञ कसे करावेत , का करावेत इत्यादी विषयांवर चर्चा करणारे ग्रंथ. ज्ञानकांड अर्थात आरण्यके आणि उपनिषदे. आरण्यके- यज्ञाविषयी विचारमंथन , ज्ञानकडे प्रवास सुरू झाला आणि कर्माकडून ज्ञानाकडे प्रवास ज्ञानस्वरूप उपनिषदे तयार होत गेली. वैदिकसाहित्यात उपनिषदांचे स्थान अजोड आहे. वैदिक धर्माची ज्ञानकांडे म्हणजे उपनिषत्. उपनिषद शब्दाचे अर्थ- उप+नि+सद् - जवळ बसणे. गुरुच्या जवळ बसून साधकाने प्राप्त केलेले ज्ञान असा होतो. आदि शंकराचार्यांच्या मते अज्ञान नाहिसे करणारी ब्रह्मविद्या म्हणजे उपनिषत्. वैदिक धर्माची ज्ञानकांडे म्हणजे उपनिषत्.

इ.स.पू. १२०० ते इ.स.पू. ६०० हा तेरा प्रमुख उपनिषदांचा काळ मानला असून बृहदारण्यकोपनिषद आणि छान्दोग्योनिषद या दोन उपनिषदांची रचना सर्वारंभी झाली.बृहदारण्यकोपनिषद आणि छान्दोग्योपनिषद ही दोन्ही उपनिषत्साहित्यात प्राचीनतम मानली जातात. याज्ञवल्क्य वाजसनेयी बृहदारण्यकोपनिषदाचा कर्ता असून उद्दालक आरुणि छांदोग्याचा कर्ता मानला जातो. या दोघांमधे गुरुशिष्याचे नाते होते यावरुन छांदोग्योपनिषद बृहदारण्यकोपनिषदापेक्षा प्राचीन असावे असा तर्क करता येईल.

छान्दोग्योपनिषद सामवेदाचे आहे. याचा विस्तार अतिशय मोठा आहे. यात ८ अध्याय आहेत , आठ अध्यायांमध्ये अनुक्रमे १३, २४, १८, १७, २४, १६, २६ व १५ असे एकूण १५४ खण्ड आणि सर्व मिळून ६३३ मंत्र आहेत. कदाचित हे सर्व उपनिषदामधील सर्वात मोठे उपनिषद असेल. अन्य उपनिषदांप्रमाणेच यातही ब्रह्माचे वर्णन , आत्मज्ञानाची चर्चा वगैरे आहेच , पण सामवेदाचे उपनिषद असल्याने उद्गात्याला उपयोगी कर्म व उपासनाही यात सांगितल्या आहेत. वेगवेगळ्या उपासनांच्या अनुषंगाने बऱ्याच कथा, आख्याने व चर्चा आहेत. काही तत्त्वे किंवा संकल्पना समजावून सांगण्यासाठी या कथांचा समावेश केला आहे. या उपनिषदात वर्णिलेल्या विषयांच्या अनुषंगाने यात येणारी व्यक्तिनामे त्यांचे अर्थ आणि ऐतिह्य जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधात केला आहे. हे उपनिषद आकाराने मोठे असल्याने आणि विषयांचे वैपुल्य यात असल्याने अंदाजे तिसच्या आसपास विविध व्यक्तिनामे यात येतात. परंतु या सर्व नामांचा इथे विचार न करता ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची असणारी काही निवडक व्यक्तिनामे यात घेतली आहेत. ती पुढीलप्रमाणे-

१. उद्दालक आरुणि - या उपनिषदाचा कर्ता उद्दालक आरुणि हेच या नावाचे सर्वप्रथम महत्त्व असे सांगता येईल-

अरुण औपवेशि गौतम यांचा हा शिष्य, अरुणाचा तो आरुणि असे तद्धित झाले. हा कुरु-पांचाल देशाचा रहिवासी होता म्हणून याचे नाव आरुणि पांचाल्य असे होते. याच्या नामाच्या व्युत्पत्तीसंबंधी एक कथा येते ती अशी- उद्दालकाच्या गुरुने त्याला शेतातील पाणी बांध घालून अडवण्यास सांगितले

होते. प्रयत्न करुनही त्याला पाणी अडवणे जमले नाही. याच्या नामाच्या व्युत्पत्तीसंबंधी एक कथा ती अशी- उद्दालकाच्या गुरुने त्याला शेतातील पाणी बांध घालून अडवण्यास सांगितले होते. प्रयत्न करुनही त्याला पाणी अडवणे जमले नाही. तेव्हा शेतात स्वतः आडवे पडून त्याने पाणी अडवले. त्याच्या गुरुभक्तीने प्रसन्न होऊन गुरुने त्याचे नाव 'उद्दालक' असे केले. श्वेतकेतु याचा मुलगा असून याने श्वेतकेतुला शिकवलेले तत्त्वज्ञान प्रसिद्ध आहे. एक याज्ञवल्क्य याचा शिष्य आहे. (बृ.उ.६.५.३) ब्रह्मविद्येची परंपरा याला ब्रह्म्याकडून मिळाली आहे. (छां.उ.१.११.४) इंद्रद्युम्न , सत्ययज्ञ, बुडिल ज्ञानी लोक याच्याक्डे अध्यात्मविद्या संपादन करण्यासाठी येत असत. राज्याभिषेकाच्या वेळी म्हणल्या जाणाऱ्या मंत्रांविषयीचे याचे मत सर्वमान्य आहे. उपनिषत्कालीन अध्यात्मविद्येचा परिणतप्रज्ञ आचार्य म्हणून उद्दालक आरुणि प्रसिद्ध होता हे स्पष्ट आहे. उपनिषत्कालीन आचार्यांमधे हाही एक मानसशास्त्रज्ञ होता. 'सुषुप्ती श्रमामुळे होणारी अवस्था असून त्या अवस्थेत जीवात्मा परमात्म्यात होतो' असे याचे मत होते. 'मृत्युसमयी मनुष्याची स्मृती नाहीशी होते तेव्हा सर्वप्रथम त्याची वाचा प्राणांमध्ये लीन होते.' या कल्पनेचा विस्तार बृहदारण्यकोपनिषदातही येतो. लोखंडी अवजारांचे उपादान कारण म्हणजेच मूळ कारण लोखंड असते तर सुवर्णालंकारांचे उपादान कारण सुवर्ण असते त्याचप्रमाणे ब्रह्म हे भूतमात्रांचे आद्य कारण असून बाकी नाममात्र आहे. (छां.उ.६.१-६) सृष्टीतील पदार्थ नाममात्र आणि मिथ्या मानून उद्दालकाने उत्तरकालीन मायावादाचा पाया घातला असे म्हणता येते.

होतो. बृहस्पति याचा शब्दशः अर्थ बृहत् म्हणजे वाणी आणि पति म्हणजे स्वामी. अर्थात वाणीचा अधिपति-वाक्पति असा अर्थ होतो. हा आंगिरस बृहस्पति एक उद्‌गीथाचा उपासक आचार्य होता. याने रचलेल्या काही सामांचा निर्देश छांदोग्योपनिषदात मिळतो. हे साम क्रौंच पक्ष्याच्या गायनसदृश मधुर असल्याचे म्हटले जाते. (छां.उ.१.२.११)

३. आश्वतराश्वि बुडिल वैयाघ्रपद्य- वाघ्रपदाचा वंशज या अर्थाने वैयाघ्रपद असे पैतृक नाम यास प्राप्त झाले. विदेह देशाचा राजा जनक आणि अश्वपति केकय राजांच्या हा समकालीन होता. याने आत्म्यासंबंधी आपले विचार प्रकट केले असून तेथे 'आप' म्हणजेच आत्मा असे त्याने प्रतिपादले. (छां.उ. ५.१६.२) बृहदारण्यक उपनिषदाच्या मते जनक सभेतील तत्त्वचर्चेतही हा सहभागी होता. (बृ.उ.५.१४.८ , शत.ब्रा.१०.६.१.१) बुलिल आश्वतर अश्वि आणि हा एकच व्यक्ति असाव्यात असा कयास आहे. (प्रा.च.को. पृ.५११)

४. उपकोसल कामलायन- कमलचा पुत्र म्हणून कामलायन असे नाव आहे. हे याचे पैतृक नाम आहे (छां.उ.४.१०-१५) छांदोग्यमते हा १२ वर्षे सत्यकामाच्या आश्रमात विद्याध्ययनार्थ राहिला. बारा वर्षांनंतर गुरुने इतर शिष्यांना समावर्तन करुन घरी जाण्यास अनुमती दिली परंतु याला ज्ञान न देता गुरु प्रवासास गेले. तेव्हा याने प्रायोपवेशन केले. यावेळी तीन अग्निंनी प्रकट होऊन याला ज्ञान दिले. पुढे सत्यकामाने याला उपदेश केला की ब्रह्म हे कमलाला न चिकटणाऱ्या जलाप्रमाणे असते. किंवा डोळ्यात तेल घातल्यावर ज्याप्रमाणे बुबुळ त्या तेलापासून अलिप्त राहते त्याप्रमाणे ब्रह्म निर्लेप सत्यकामाने त्याला तीन सांकेतिक शब्दांनी उपदेश केला- १. संयद्वाम म्हणजे कर्मानुसारी गति २.

वामनी म्हणजे पुण्यकर्मानुसारी गति ३. भामनी म्हणजे आदित्य , चंद्र, अग्नि आदिनुसार गति. हीच उपकोसल विद्या म्हणून प्रसिद्ध आहे.

५. उषस्ति चाक्रायण- बृहदारण्यक उपनिषदात याचा उल्लेख उषस्त असा येतो. (बृ.उ.३.४.२) हा एक तत्वज्ञानी आचार्य असून जनकसभेत याने याज्ञवल्क्याबरोबर तत्वचर्चा केली होती अशा कथा येतात.( छां.उ.१.१०.१)

प्राणाच्या श्रेष्ठत्वाचे प्रतिपादन करताना छांदोग्यात कथा येते- उषस्त चाक्रायण दुष्काळात आपल्या पत्नीसह एका गावात रहात असतो. भुकेल्या अवस्थेत तो एका माहुताचे उष्टे हुलगे प्राणरक्षणासाठी खातो. परंतु उष्टे पाणी पिण्यास मात्र नकार देतो. आपद्धर्म असताना उष्टे अन्न खाणे समर्थनीय ठरते हे सांगणारी कथा आहे. यावर आधारित 'प्राण जात असेल तर सदोष अन्न खाण्यास हरकत नाही' अशा अर्थाचे ब्रह्मसूत्र बादरायण व्यासमुनींनी लिहिले. बृहदारण्यकाच्या मते उषस्त चाक्रायणाने विदेह राजा जनकाच्या सभेत'सर्वान्तर्यामी आत्म्याला कसे जाणावे आणि पहावे असा प्रश्न प्रश्न याज्ञवल्क्याला विचारला होता. (बृ.उ.३.११.१) यावरुन हा उपनिषत्कालीन मोठा पुरुष होता हे सिद्ध होते.

६. चैकितायन दाल्भ्य यालाच बक दाल्भ्य, गाल्व मैत्रेय, दाल्भ्य चैकितायन असेही संबोधले जाते. जाते. हा उद्गीथ प्रवीण आचार्य होता. याने 'उद्गीथ साम' याविषयी चर्चा केली आहे. (छां.उ.१.८.१) दल्भाचा वंश तो दाल्भ्य. हाच दाभ्र्य असाही उल्लेख येतो हा एक वैयाकरण असावे असे मत आहे. (प्रा.च.को.पृ.२७०)

७. प्रवाहण जैवलि- हा पांचाल देशाचा राजर्षि असून उद्गीथ विद्येत प्रवीण होता. याने उद्गीथ उपासनेसंबंधी शिलक शालावत्य आणि चैकितायन दाल्भ्य या ऋषींशी चर्चा केली होती. (छां.उ.१.८.१ , बृ.उ.६.२.१) हा पांचाल देशाचा राजा दार्शनिक आणि शास्त्रांमधे प्रवीण होता. हा उद्दालकाचा समकालीन होता. जीवल वंशाचा म्हणून जैवलि किंवा जैवल अशी उपाधि याला प्राप्त झाली होती.

८. शिलक शालावत्य - शलावतीचा वंशज या अर्थाने शालावत्य हे पैतृक नाम आहे. उद्गीथ सामविषयक तत्वचर्चेत हा सहभागी होता हे वर उल्लेखले आहेच.

९. शौनक कापेय- हा अभिप्रतारिन् काक्षसेनि आचार्यांच्या समकालीन होता. अन्नदानाचे महात्म्य , संवर्गविद्या याचे महत्त्व छांदोग्यात आले आहे. (छां.उ.४.३.५-८)

१०. सत्ययज्ञ पौलिषि प्राचीनयोग्य- ब्रहम म्हणजे काय या संबंधी जिज्ञासा असणारा यज्ञवेत्ता आचार्य. पुलुष आणि प्राचीनयोग यांचा वंशज या अर्थाने पौलिषि आणि प्राचीनयोग्य ही पैतृक नामे आहेत. (छां.उ.५.११.१)

११. उदर शांडिल्य अतिधन्वन् शौनक नावच्या आचार्यांचा हा शिष्य (छां.उ.१.९.३) असून याने उद्गीथ सामावर चर्चा केली आहे. आकाशास परमात्मा मानून उपासना करुन याला सिद्धी प्राप्त झाली होती. (छां.उ.१.९) हा उद्गीथप्रवीण आचार्य होता.

१२. कौषीतकि कुषीतकाचा पुत्र म्हणून कौषीतकि. हा उद्गीथ विद्याप्रवीण आचार्य होता. बृहदारण्यक उपनिषदात 'कहोड कौषीतकि' या नावाने त्याचा उल्लेख येतो (बृ.उ.३.५.१) याने जनक-राजसभेत याज्ञवल्क्यासमवेत तत्वचर्चा केली होती. याने आपल्या पुत्राला उद्गीथ- ओंकार माहात्म्य सांगितले

असून 'या उपासनेने तुला समृद्धिप्राप्ती होईल' असा आशीर्वाद दिला. याने ;कौषीतकि उपनिषद' आणि 'शांखायन ब्राह्मण' हे ग्रंथ लिहिले.

१३. जन शार्कराक्ष्य- हा आत्मा, ब्रह्म या ज्ञानविषयी जिज्ञासू आचार्य होता. हा उद्दालकाचा शिष्य होता. (छां.उ.१.८.१) शतपथब्राह्मणमते अश्वपति कैकेय राजर्षि तसेच अरुण औपवेशि आचार्य आणि त्याचा पुत्र पुत्र उद्दालक आरुणि यांच्या समकालीन होता. (श.ब्रा. १०.६.१.१) उद्दालक आरुणिकडे हा वैश्वानर ब्रह्माचे सत्यस्वरूप जाणण्यासाठी गेला. तेव्हा विषयाचा विशेष ज्ञाता अश्वपति कैकेय राजर्षिकडे पाठवले. राजाने राजाने दक्षिणा देऊ केल्यावर आम्ही दक्षिणेसाठी आलो नसून आत्म्याचे ज्ञान मिळवण्यासाठी आलो आहोत. यावर राजाने त्याच्या उपासनांसंबंधी विचारले असता त्याने सांगितले की तो आकाशाची तो ब्रह्म म्हणून उपासना करतो. यावर अश्वपतिने त्याच्या उपासनेतील त्रुटी सांगून त्याला वैश्वानर आत्म्याचे पूर्ण ज्ञान दिले.

या सगळ्या अभ्यासावरून असे निरीक्षण मांडता येते की छांदोग्योपनिषदात आलेली ही बहुतांशी आत्मज्ञानप्रवीण अशा आत्मवेत्त्यांची असून बरीच नावे पैतृक आहेत. यापैकी काही राजे , राजर्षि आहेत त्याच बरोबर तत्वज्ञ सुद्धा आहेत.

**संक्षेप**

प्रा.च.को.- प्राचीनचरित्रकोश
बृ.उ.- बृहदारण्यकोपनिषद
छां.उ.- छांदोग्योपनिषद
श.ब्रा. - शतपथब्राह्मण

**संदर्भग्रंथसूची**

चित्राव सिद्धेश्वर. *उपनिषदांचे मराठी भाषांतर*.भारतीय चरित्रकोश मंडळ.पुणे
चित्राव सिद्धेश्वर. १९६४. *प्राचीन चरित्रकोश*.भारतीय चरित्रकोश मंडळ.पुणे
जोग, द. वा. १९८१. *सुबोध उपनिषत्संग्रह*. भाग पहिला. गायत्री साहित्य. पुणे
जोग, द. वा. १९८१. *सुबोध उपनिषत्संग्रह*. भाग दुसरा. गायत्री साहित्य. पुणे